IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# निजामाबाद जिल्ह्यातील लिंग गुणोत्तराचा भौगोलिक अभ्यास

प्रा.डॉं.भीमराव माळगे
भूगोल विभाग प्रमुख,
वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय, देगलूर, जि. नांदेड, महाराष्ट्र

**गोषवारा :**

विकासाच्या अनेक मानकापैकी एक मानक म्हणजे लिंग गुणोत्तर होय. लिंग-गुणोत्तर हा लोकसंख्याशास्त्रीय अभ्यासाच्या मुख्य घटकांपैकी एक आहे. ज्यावरून पुरुष आणि महिला लोकसंख्येची क्षमता ओळखता येते. लिंग गुणोत्तराची व्याख्या लोकसंख्येतील १००० पुरुषांमागे महिलांची संख्या यावरून केली गेली आहे, दर १००० पुरुषांमागे महिलांची संख्या व्यक्त केली जाते. प्रस्तुत अभ्यासात खालील विशिष्ट उद्दिष्ट्ये विचारात घेण्यात आला आहे: जिल्हानिहाय लिंग गुणोत्तर जाणून घेणे. २००१ आणि २०११ मधील लिंग गुणोत्तरातील फरक जाणून घेण्यासाठी प्रस्तुत अभ्यास दुय्यम स्त्रोतावर आधारित आहे. निजामाबाद हे तेलंगणा राज्यातील एक महत्त्वाचा जिल्हा आहे हा जिल्हा दखनच्या पठारावर मध्यवर्ती भागात वसलेला आहे. निजामाबाद जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८°0५' उ. अक्षवृत ते १९°00' असून रेखावृत्तीय विस्तार ७४°४०' पु. रेखावृत्त ते ७८°३७' पु. रेखावृत्त असा आहे. निजामाबाद जिल्ह्याचा एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ७९५६ चौ.कि.मी.आहे. निजामाबाद जिल्ह्यातील नंदिपेट मंडळात लिंग गुणोत्तराचे प्रमाण सर्वाधिक १०९१ इतके होते आणि सर्वात कमी लिंग गुणोत्तराचे प्रमाण जुक्कल मंडळात ९५९ इतका दिसून आलेले आहे. निजामाबाद जिल्ह्यात व तेलंगणा राज्याचा विचार केल्यास राज्याच्या तुलनेत निजामाबाद जिल्ह्याचे लिंग गुणोत्तर जास्त आहे. तेलंगणा राज्याचा लिंग गुणोत्तर ९९३ तर निजामाबाद जिल्ह्याचा लिंग गुणोत्तर १०४० इतका आहे. निजामाबाद जिल्ह्यात इतर जिल्ह्या पेक्षा लिंग गुणोत्तराचे प्रमाण अत्याधिक आहे.

**प्रस्तावना :**

एखाद्या देशातील समाजाचा दर्जा कसा आहे ते तेथील स्त्रियांच्या अवस्थेवरून समजते. प्रादेशिक विकासा आर्थिक दृष्टिकोनातून मानवी संसाधनांचा अभ्यास महत्त्वाचा आहे. प्रादेशिक विकासाच्या आर्थिक दृष्टिकोनातून मानवी संसाधनाचा अभ्यास महत्त्वाचा आहे. लग्नाच्या विविध पैलूंचा आर्थिक व्यवसायावर व क्रिया कलापावर प्रभाव पडतो आणि राहणीमानाचा दर्जा निश्चित करतात. लोकसंख्या संसाधन एक श्रमशक्ती आहे जी उत्पादन प्रक्रियेत मदत करते. त्यामुळे प्रदेशाची लोकसंख्याशास्त्रीय वैशिष्ट्ये परिमाणात्मक आणि गुणात्मक दृष्टीने जाणून घेणे आवश्यक आहे. भावाच्या उत्क्रांतीनंतर लाखो वर्षांपासून हवा पाणी जमीन यांच्यासोबतच पृथ्वीच्या पृष्ठभागावर मोठ्या प्रमाणात मोठ्या भागावर एक नवीन आणि विश्वसनीय पातळ

थर पसरलेला आहे हा थर म्हणजे मानवी लोकसंख्या होय याचा परिणाम वनस्पती प्राणी व नैसर्गिक घटकावर झालेला दिसून येत आहे. आर्थिक विकास आणि सामाजिक कल्याण या दोन्ही दृष्टिकोनातून मानवी संसाधनाचा अभ्यास महत्त्वाचा आहे. जागतिक लोक संख्या एखाद्या प्रदेशातील वाढत जाणारी लोकसंख्या लोकसंख्येचे वितरण यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे ज्या प्रदेशात लोकसंख्येच्या संदर्भात असा मनात आहे अशा ठिकाणी विकासाला बाधा ठरलेली आहे. म्हणून लोकसंख्येचा अभ्यास करत असताना लिंग गुणोत्तराचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. लोकसंख्या वाढ, वितरण आणि घनता यांचा अभ्यास केल्याशिवाय प्रादेशिक अभ्यास पूर्ण होऊ शकत नाही हे सांगण्याची गरज नाही. लोकसंख्या घनतेतील फरकाचा परिणाम भूमी उपयोजन व नैसर्गिक संसाधनावर परिणाम होत असतो.

शाश्वत विकासामध्ये जमीन आणि जलस्रोतांचे संरक्षण महत्त्वाचे आहे. वाढती लोकसंख्या व बदललेले राहणीमान आणि त्यासोबतच मानवाच्या विविध क्रिया याचा परिणाम मर्यादित नैसर्गिक साधनसंपदावर पडत आहे. दबाव नित्यामुळे लोकसंख्येचे नियोजन करणे आवश्यक आहे तसेच संसाधनांचे नियोजन करणे आवश्यक आहे. लिंग गुणोत्तराचा परिणाम लोकसंख्येची रचना लोकसंख्येचे स्थलांतर लोकसंख्येचे वितरण यावर सुद्धा होत असतो म्हणून लिंग गुणोत्तराच्या अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. लिंग गुणोत्तराची व्याख्या लोकसंख्येतील हजार पुरुषामागे किती महिला आहेत हे जाणून घेणे होय.

लिंग गुणोत्तर हे सर्वात वैशिष्ट्यपूर्ण लोकसंख्या शास्त्रीय सूचक आहे जे जन्मदर मृत्युदर व्यावसायिक रचना आणि लोकसंख्येचे स्थलांतर इत्यादी वैशिष्ट्यांचे मूल्यांकन करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते. लैंगिक रचनेचे विश्लेषण करण्यासाठी लिंग गुणोत्तराचा विचार केला जातो. गुणोत्तराच्या बदलामुळे शहरीकरणाचा अंदाज सुद्धा घेता येतो म्हणून लिंग गुणोत्तरचा अभ्यास महत्त्वपूर्ण वाटते.

## उद्दिष्टे

प्रस्तुत अभ्यास करण्यासाठी खालील उद्दिष्ट्ये विचारात घेण्यात आले आहेत.

१) निजामाबाद जिल्ह्यातील मंडळ निहाय लिंग गुणोत्तर जाणून घेणे.

२) 2001 आणि 2011 मध्ये लिंग गुणोत्तर फरक जाणून घेणे.

सामग्री संकलन आणि संशोधन पद्धती:

संशोधन क्षेत्रातील लिंग गुणोत्तराचा अभ्यास दुय्यम स्त्रोताचा आढावा घेण्यात आला आहे. निजामाबाद जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा सांख्यिकी केंद्रात प्रत्यक्ष जाऊन माहिती जमा करण्यात आली. त्याचप्रमाणे २००१ ते २०११ च्या जनगणनेचा अभ्यास करण्यात आला. सदर शोध निबंध निजामाबाद जिल्ह्यातील लिंग गुणोत्तरावर आधारित आहे व हा शोधनिबंध या संदर्भातच मर्यादित असून त्यासाठी २००१ ते २०११ या वर्षाच्या कालावधीची माहिती संशोधांनासाठी निवड करण्यात आली आहे.

$$\text{लिंग गुणोत्तर} = \frac{\text{एकूण स्त्रिया}}{\text{एकूण पुरुष}} \times १०००$$

डेटाच्या दुय्यम स्त्रोतांवर आधारित सध्याचा अभ्यास, अभ्यास क्षेत्र हा प्रशासनाचा प्रदेश असला तरी, जिल्हा हा एकक अभ्यास म्हणून घेण्यात आला आहे.

अभ्यास क्षेत्र :

निजामाबाद जिल्ह्याचे स्थान कर्नाटक व महाराष्ट्र राज्याच्या सीमे लगत असून निजामाबाद जिल्ह्याच्या पश्चिमेस कर्नाटक तर उत्तरेस महाराष्ट्र राज्य आहे. निजामाबाद जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८°0५' उ. अक्षवृत ते १९°00' असून रेखावृत्तीय विस्तार ७४°४०' पु. रेखावृत्त ते ७८°३७' पु. रेखावृत्त असा आहे.

निजामाबाद जिल्हा मागास जिल्हयापैकी एक जिल्हा म्हणून ओळखला जातो. निजामाबाद जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ७९५६ चौ.कि..मी. असून एकूण राज्याच्या क्षेत्रफळापैकी ३.८२ % आहे. निजामाबाद जिल्ह्यात सरासरी ९०० ते ११०० मी.मी. पर्ज्यन होते. निजामाबाद जिल्ह्यातील बहुतांश लोक शेती व्यवसायाशी निगडीत आहेत.

**निजामाबाद जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर :**


निजामाबाद जिल्ह्यात एकूण ३५ मंडळ असून त्यापैकी सर्वाधिक लोकसंख्या असलेला मंडळ म्हणजे निजामाबाद मंडळ होय. निजामाबाद जिल्ह्यातील ३५ मंडळतील 2001 व 2011 च्या जनगणनेनुसार अभ्यास केल्यानंतर खालील प्रमाणे परिणाम दिसून आले आहेत.

तक्ता क्रं. 01 निजामाबाद जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर

| अ.क्रं | मंडल | 2001 | 2011 | बदल % | अ.क्रं | मंडल | 2001 | 2011 | बदल % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 01 | रांजल | 1023 | 1003 | -1.96 | 19 | बिचकुंडा | 985 | 1003 | +1.82 |
| 02 | नवीपेट | 1032 | 1034 | +0.19 | 20 | बिरकुर | 1022 | 1052 | +2.93 |
| 03 | नंदिपेट | 1053 | 1091 | +3.60 | 21 | वर्णी | 1004 | 1045 | +4.08 |
| 04 | अरमुर | 1018 | 1039 | +2.06 | 22 | दाचपल्ले | 1043 | 1058 | +1.44 |
| 05 | बालकोंडा | 1052 | 1087 | +3.32 | 23 | धरपल्ले | 1071 | 1090 | +1.77 |
| 06 | मोरताड | 1057 | 1065 | +0.75 | 24 | सिरकोंडा | 1052 | 1070 | +1.71 |
| 07 | कम्मेरपल्ले | 1051 | 1056 | +0.47 | 25 | मचारेड्डी | 1031 | 1056 | +2.42 |
| 08 | भीमगल | 1051 | 1055 | +0.38 | 26 | सदसिवनगर | 1009 | 1046 | +3.66 |
| 09 | वेलपूर | 1059 | 1061 | +0.18 | 27 | गंधारी | 987 | 988 | +0.10 |
| 10 | जकरनपल्ले | 1104 | 1065 | -3.53 | 28 | बांसवडा | 1026 | 1073 | +4.58 |
| 11 | मचलूर | 1069 | 1087 | +1.68 | 29 | पिटलम | 995 | 1029 | +3.41 |
| 12 | दोमाकोंडा | 1011 | 1034 | +2.27 | 30 | निजामसागर | 1035 | 1063 | +2.70 |
| 13 | येड्पल्ले | 1041 | 1053 | +1.15 | 31 | यल्लारेड्डी | 1011 | 1051 | +3.95 |
| 14 | बोधन | 997 | 1024 | +2.70 | 32 | नागारेड्डीपेट | 1055 | 1084 | +2.74 |
| 15 | कोटगीरी | 1007 | 1038 | +3.07 | 33 | लिंगमपेट | 1039 | 1054 | +1.44 |
| 16 | मदनूर | 978 | 969 | -0.92 | 34 | तडवइ | 1014 | 1077 | +6.21 |
| 17 | जुककल | 957 | 959 | +0.20 | 35 | कामारेड्डी | 988 | 1028 | +4.04 |
| 18 | भीकनूर | 989 | 1046 | +5.76 | | | | | |
| जिल्हा एकूण सरासरी | | | | | | | 1017 | 1040 | +2.26 |
| राज्य एकूण सरासरी | | | | | | | 978 | 993 | +1.53 |




निजामाबाद जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर 2001-11




## निष्कर्ष

निजामाबाद जिल्ह्यातील लिंग गुणोत्तराचा वरील तक्त्यानुसार अभ्यास केल्यास असे लक्षात येते की रांजल, जकरनपल्ले व मदनूर या मंडळा मध्ये लिंग गुणोत्तरात ऋणात्मक बदल झालेला आढळून येतो. नवीपेट, मोरताड, कम्मेरपल्ले, बिमगल, वेलपूर, मकलूर, येड्पल्ले, जुक्कल, बिककुंदा, डिकपल्ले, दरपल्ले, सिरकोंडा, गंदरी व लिंगमपेट या मंडळात 0 ते 2 % लिंग गुणोत्तरात बदल झालेला दिसून येतो. नागारेड्डीपेट, यल्लारेड्डी, निजामसागर, पिटलम, सदसिवनगर, मकरेड्डी, बिरकुर, बोडन, कोटगिरी, बालकोंडा, आरमुर व नंदिपेट या मंडळात 2 ते 4 % लिंग गुणोत्तरात बदल झालेला दिसून येतो. बिकनूर, वर्णी, बांसवडा व कामारेड्डी या मंडळात 4 % पेक्षा जास्त लिंग गुणोत्तरात बदल झालेला दिसून येतो. बिकनूर, वर्णी, बांसवडा व कामारेड्डी या मंडळावर मात्र सत्ताक कुटुंब पद्धतीचा परिणाम झालेला आढळून येतो कारण या मंडळा मध्ये लिंग गुणोत्तराचे प्रमाण इतर मंडळाच्या तुलनेत जास्त आढळून येते. निजामाबाद जिल्ह्यातील रांजल, जकरनपल्ले व मदनूर या मंडळा मध्ये लिंग गुणोत्तरामध्ये ऋणात्मक बदल झालेला आढळून येतो. निजामाबाद जिल्ह्यातील तडवई मंडळात सर्वाधिक धनात्मक बदल झालेला आढळून येतो तर जकरनपल्ले मंडळात लिंग गुणोत्तरात सर्वाधिक ऋणात्मक बदल झालेला आढळून आलेला आहे. तेलंगणा राज्याच्या तुलनेत निजामाबाद जिल्ह्याचे लिंग गुणोत्तरामध्ये जास्त बदल झालेला दिसून येतो त्या प्रमाणात तेलंगणा राज्याच्या लिंग गुणोत्तरात वाढ झालेली दिसून येत नाही.

**संदर्भ:**

1) निजामाबाद जिल्हा सामाजिक व आर्थिक पाहणी 2001

2) निजामाबाद जिल्हा सामाजिक व आर्थिक पाहणी 2011

3) Betal, H.R. (2001), Use of Statistical Techniques of the study of urbanization in North Bengal- Geographical Review of India, Vol. 63 No. 1-4

3) Bhosale, B.A. and Karale (1985). Spatio Temporal Patterns population Growth and Distribution – A case study of Ahmad Nagar Dist. National Association Geographers India, p-109.

4) Census of India. (2001). Nizamabad State PLCN.

5) Census of India. (2011). Nizamabad State PLCN.

6) Nayaklal Shivakumar, H.S. (2012). An integrated approach for planning development and management of watershed- A case study of Varada river basin, Karnataka. Dept. of Geography, Bengaluru University, Bengaluru.

7) Priya, N. (2008). Land Transformation Due to Urban Sprawl In Bengaluru City- A Geographers Approach Using GIS & Remote Sensing Techniques. Dept. of Geography, Bengaluru University, Bengaluru.